# "1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे राजकीय क्षेत्रावर झालेली परिणाम"

**सह्या प्रा.शरद विठ्ठल पाटील,** राज्यशास्त्र विभाग, न्यू कॉलेज कोल्हापूर, कोल्हापूर.

---

1991 नंतर जगात जे बदल होत गेले त्याचा परिणाम 1989 मध्ये पूर्व युरोपमधील बद्दल, 1990 ची कुवेत ची समस्या आणि 1991 चे सोवियेत रशियाची विघटन या महत्त्वाच्या कारणामुळे 1991 नंतर जगात अनेक बदल घडून आले. कुतवेच्या समस्येदरम्यान 'नवीन जागतिक व्यवस्था' हा शब्दप्रयोग पुढे आला होता. पुढे सोवियेत रशियाच्या विघटनानंतर सोवियत रशियानंतरचे युग आणि शित युद्धउतर तर कालखंड हे दोन शब्दप्रयोग वापरले गेले १९९१ नंतरच्या राजकीय आणि सुरक्षाविषयक व्यवस्थेचे वर्णन करणारे हे सर्व शब्द प्रयोग होते. 1990 च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात एक नवीन शब्दप्रयोग पुढे आला तो म्हणजे 'जागतिकीकरण' हा शब्द प्रयोग अधिक व्यापक स्वरूपाचा होता. 1991 नंतरच्या काळातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, तंत्रज्ञान आणि विचारप्रणाली विषय बदलांचा यात समावेश केला जात होता. आज एकंदरीतच 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेचे राजकीय क्षेत्रावर परिणाम आपल्याला दिसून येतात. साधारणपणे 1991 ते 2023 या दरम्यान जागतिकीकरणाचे परिणाम जगाच्या राजकीय व्यवस्थेवर पडलेले आहेत. याविषय या शोधनिबंधात विचर मंथन करण्यात येणार आहे.

**संशोधनाची उदिष्टे**

1.जागतिकीकरणचा आभ्यासणे

ब) मुक्त अर्थव्यवस्थेचे राजकीय क्षेत्रावर झालेली परिणाम आभ्यासणे.

क) लोकशाहीची वैचारिक बदल आभ्यासणे

**संशोधन पद्धती**

सदर शोधनिबंधाच्या लेखनासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधन स्रोत**

प्रस्तुत शोधनिबंधात लेखनासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा उपयोग करण्यात आला असून यातील स्पष्टीकरनासाठी इंटनेट,संदर्भग्रंथ,वर्तमान पत्र उपयुक्त मासिकांचा योग्य प्रमाणात उपयोग करण्यात आला आहे.

**आशय विश्लेषण :-**

**अ) जागतिकीकरणचा आभ्यासणे :-**

जागतिकीकरण म्हणजे काय

जागतिकीकरणाबद्दल आपण बोललो तेव्हा परस्पराशी जोडलेल्या जागतिक व्यवस्थेबद्दल आपण बोलत असतो, तंत्रज्ञानातील होणाऱ्या विकासामुळे जे बदल झालेले आहेत. कोणत्याही संस्थेची कंपनीशी राजकीय व्यवस्थेची संपर्क साधता येतो. आर्थिक व्यवहार आणि व्यापाराच्या संदर्भात देखील बदल झालेले दिसून येतात जागतिकीकरण आणि राष्ट्र आणि राष्ट्रातील लोक एकमेकांशी जोडलेले आहेत. या जागतिकीकरणातून जग हे एक या संकल्पनेवर सर्व लोक एकत्र आलेली दिसून येतात. आज जगाच्या राजकारणामध्ये एका देशातील समस्या ही फक्त एका देशाची समस्या राहिलेली नसून त्या समस्येचा परिणाम जगातील इतर देशांच्या वर आपल्याला झालेला दिसून येतो म्हणजेच राजकीय आर्थिक बदलाचा सामाजिक आणि सांस्कृतिक घटकावरील परिणाम झालेला दिसून येतो. या अनुषंगाने या शोधनिबंधामध्ये 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेची राजकीय क्षेत्रावर झालेले परिणाम आपण अभ्यासणार आहोत.

**ब) मुक्त अर्थव्यवस्थेचे राजकीय क्षेत्रावर झालेली परिणाम आभ्यासणे**

१) राजकीय लोकशाहीचे महत्त्व :-

1989 ची पूर्व युरोपमधील क्रांती आणि सोव्हिएत रशियाचे विघटन यांच्याकडे कम्युनिझमचा झालेला अंत अशा स्वरूपात बघितले जाते. जग हे लोकशाही व्यवस्थेच्या दिशेने वाचाल करत आहे असे मानले जाते. सहभागी राज्य नागरिक केंद्र शासन आणि सुशासन या संकल्पना आता महत्त्वाच्या होत आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये निर्णय हे बहुमताने घेतले जातात. सहभागी शासन व्यवस्थेत त्या पारंपरिक निर्णय प्रक्रियेच्या पलीकडे जाऊन समाजातील

सर्व घटकांना निर्णय प्रक्रियेत कसे सामील करता येईल हे बघितले जाते. नागरिक केंद्र शासन आणि सुशासन व्यवस्थेत नागरिक समाजाचा सहभागावर भर दिला जातो. लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये एकंदरीतच जगातील लोकशाही शासन व्यवस्थेच्या देशांनी साम्यवादी शासन व्यवस्था ही देशाच्या आर्थिक धैर्यासाठी फोल ठरलेली आहे. अशी हाकाटी दिलेली आपल्याला दिसून येते. एकंदरीतच जगातील आणि अमेरिकेच्या शास्त्रज्ञांनी लोकशाही शासन व्यवस्थेचे महत्त्व वाढवण्यासाठी सामाजिक शासन आणि इतिहासाचा अंत झाला हे शब्दप्रयोग या परिस्थितीमध्ये पुढे आणलेले आपल्याला दिसून येतो. एकंदरीतच लोकशाहीचे महत्त्व 1991 नंतर वाढलेले आपल्याला दिसून येते.

२) राज्याचे स्थान :-

जागतिकीकरणाच्या संदर्भात असे मानले जाते की आता राज्याचे महत्त्व कमी होत चाललेले आहे. सार्वभौमत्व हा राज्याचा एक महत्त्वाचा घटक आहे सार्वभौमत्व ही संकल्पना राज्याच्या अधिकार क्षेत्राशी जोडली गेली आहे. त्याच्या साधारण राज्याला आपल्या अधिकार क्षेत्रात कायदे करण्याचा अधिकार असतो या सार्वभौमत्वावर आज अंतर्गत तसेच बाह्य घटकाचा वरून आघात होत आहेत असे मानले जाते. आंतरराष्ट्रीय कायद्याचा विस्तार प्रादेशिक आर्थिक संघटना बाजारपेठेचे जागतिकीकरण पर्यावरण आणि मानवी प्रश्नाबाबतचे वाढती चिंता ही सर्व बाह्य आव्हाने आहे. तर राष्ट्रीय पातळीवरील सहमतीचा अभाव व त्यातून निर्माण होणारी मतभेद वाढता वांशिक राष्ट्रवाद, बिगर राष्ट्रीय घटकांचे कार्य तसेच पर्यावरण लिंगभेद आणि मानवतावादी समस्यांना मिळणारे केंद्रस्थान हे सर्व अंतर्गत आव्हाने असलेल्या आपल्याला दिसून येतात. एकंदरीतच जागतिकरणाच्या संदर्भात राज्याचे स्थान हे विस्तारित स्वरूपात झालेले दिसून येतील बिगर राजकीय घटक नागरिक समाजाला मिळालेल्या वाढत्या महत्त्वामुळे बिगर राजकीय घटक पुढे आले म्हणूनच स्वयंसेवी संघटना आणि गैर्य सरकारी संघटना नॉन गव्हर्मेंटल ऑर्गनायझेशन एनजीओ यांना महत्त्व प्राप्त झाली झाले. त्या संस्था मानवी समस्यांच्या प्रश्नावर भर देतात आज आंतरराष्ट्रीय संबंध हे केवळ राष्ट्रांच्या संबंधापुरते मर्यादित राहिली नाही तर त्यात बिगर राजकीय घटकांचा देखील समावेश झाला आहे. इंटरनॅशनल ग्रीन पीस सारख्या संघटना देखील दहशतवादी गट देखील या बिगर राजकीय घटकांमध्ये सामील झालेले आहे. आणि या बिगर राजकीय घटकांनी आपला प्रभाव लोकशाही व्यवस्थेवर पडलेला दिसून येतो. एकंदरीतच देशाच्या लोकशाही व्यवस्थेमध्ये या बिगर राजकीय घटकांचे महत्त्व आज अन्य साधारण झालेले आहे आज हे बिगर राजकीय घटक देशांतर्गत किंवा देशाबाहेर सुद्धा कार्यरत असलेले दिसून येतात. एकंदरीतच जागतिकरणांमध्ये व्यक्तीच्या व्यक्तिस्वातंत्र्य आणि मानवतावादी मूल्यांना महत्त्व प्राप्त झालेले दिसून येते.

३) मानवी हक्क :-

जागतिकरणाच्या युगात मानव अधिकाराचे संरक्षण एक महत्त्वाचा विषय बनला आहे. परंतु विकसित आणि विकसनशील देशात मानवी कराच्या दृष्टिकोनात फरक करण्याची गरज आहे तिसऱ्या जगाच्या दृष्टीने नागरी आणि राजकीय हक्काच्या आधी आर्थिक विकास साधण्याची गरज असते तसेच वैयक्तिक अधिकारापेक्षा समाज व कुटुंब यांचे महत्त्व अधिक आहे. उदाहरणार्थ भारतीय संविधानाने सामाजिक न्यायवर अधिक भर देऊन अन्न,वस्त्र,निवारा,शिक्षण आणि स्वास्थ यांना प्राथमिक महत्त्व दिले असेही मानले जाते. ही वितरणात्मक न्याय मिळवून देण्यासाठी लोक कल्याणापेक्षा स्वतंत्र शाखावर जास्त भर दिला जातो म्हणून राष्ट्रांना आपल्या इतिहास संस्कृती राजकीय व्यवस्था आणि अर्थव्यवस्था या आधारे मानवी हक्काबाबत निर्णय घेण्याचा अधिकार दिला पाहिजे. थोडक्यात नागरी आणि राजकीय स्वातंत्र्य या दृष्टिकोनाला प्रात्यक्षिक स्थानिक परिस्थितीची सांगड घालण्याची गरज आहे. वरील सर्व गोष्टी अधिक तपशील आणि समजून घेण्यासाठी काही उदाहरणे उपयुक्त ठरतील. भारतात वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय कराराचा आणि घटनांचा सभासद आहे जागत व्यापार संघटनेचा सभासद आहे. आंतरराष्ट्रीय व्यापारा बरोबर काही नियमांचे पालन करावे लागते पाकिस्तानबरोबर केलेला सिंधू नदीचा पाणी वाटपाच्या करारामुळे तसेच बांगलादेशाशी केलेला पराग का पाणी वाटप करायला त्यामुळे सिंधू पाणी वाटपा बाबत नियमांचे भारताला पालन करावे लागेल. आणि एकंदरीत जागतिक बँकेची मदत घेण्यासाठी आज प्रत्येक देश

जागतिक बँकेच्या वरती अवलंबून आहे. जैतापूर आणि कुंडमकुलम येथील आण्विक प्रकल्पना विरोध केला जात आहे या प्रकल्पना योग्य त्या परवानगी मिळून देखील काही राजकीय पक्ष एनजीओ त्यांना विरोध करणारे आपल्याला दिसून येते. सर्व प्रकरणांच्या मध्ये राज्याच्या सार्वमत्वाला आव्हान दिले गेले आहे राज्याच्या अंतर्गत आणि बाह्य स्वरूपाच्या आव्हानांची ही उदाहरणे आहेत म्हणून असेही मानले जाते की आता राज्याचे कार्य कमी होत चालले आहेत.आर्थिक क्षेत्राच्या वाढीमुळे आर्थिक क्षेत्रात आणि अंतर्गत आणि बाह्य आव्हानामुळे राजकीय क्षेत्राची राज्याची भूमिका हळू कमी होत चाललली आहे. जागतिकरणाच्या युगात राज्याला किती महत्व आहे राजकीय संकल्पना आज देखील महत्त्वाचे आहे. जनकल्याण आणि विकासाच्या कार्यातून राज्यव्यवस्था आता माघार घेत आहे. काय असा प्रश्न निर्माण झालेला आहे एकंदरीतच आपण राज्याच्या मुख्य घटकाकडे सार्वमत शासन आणि जनता हेही घटक आहेत आज राज्याच्या प्रदेश आबादित आहे. आपण आज देखील राष्ट्रवादी आणि राष्ट्रीय एकात्मतेविषयी बोलतो सार्वभौम शासन ही संकल्पना देखील अस्तित्वात आहे. आंतरराष्ट्रीय कारराच्या जबाबदाऱ्यामुळे राज्याची सत्ता कमी झाली आहे. परंतु राज्याचे अधिकार आज देखील अस्तित्वात आहेत. स्वयम निर्णयाच्या हक्काच्या आधारे नवीन जागतिकीकरणाचा परिणाम हा लोकशाही शासन व्यवस्थेवर पडलेला दिसून येतो. 1991 च्या मुक्त अर्थव्यवस्थेमुळे विचार करून आणि तंत्रज्ञान यांच्यामध्ये सुद्धा फरक पडलेला आहे. लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये आज लोकांच्या समोर निवडणुकीच्या माध्यमातून राजकीय पक्ष जात आहेत.

**क) लोकशाहीतील वैचारिक बदल आभ्यासणे**

आज मुक्त अर्थव्यवस्थेने लोकशाहीची दिशा बद्दलली आहे.सगळयात महत्त्वाचा प्रश्न निर्माण केला आहे तो मानवतावादाचा.

1. पर्यावरण आणि शाश्वत विकास याच्यावर आधारावर सर्व देश एकत्र येत आहेत एकंदरीतच पर्यावरणाशी निगडित समस्या बाबतीत आज इतर प्रश्न बाजूला ठेवून सर्व राजकीय पक्ष सर्व देश जगाच्या राजकारणामध्ये एकत्र आलेले आपल्याला पाहाव्यास मिळतात.

2. 1972 स्टॉक होम मध्ये संपूर्ण राष्ट्रांच्या मानवी वर्ष पर्यावरण विषय परिषदेत झाली. याठिकाणी पहिल्यांदाच आर्थिक विकास आणि पर्यावरणाचा ऱ्हास या संबंधातील विचार आज आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेला दिसून येतात.

3. आंतरराष्ट्रीय सहकारी निर्माण करण्याचा तसेच पर्यावरण विकास यांना एकत्रित विचार करण्यासाठी जनजागृती करण्याचा प्रयत्न लोकशाही मार्गने केला जात आहे.

4. राष्ट्रीय प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील संस्थांसाठी शाश्वत विकास हे आज सर्वच देशा समोरची महत्त्वाची ध्येय ठरलेले आहे.

5. पर्यावरणातील पर्यायी संसाधनाचे रक्षण,ऊर्जेचे पर्यायी स्रोत शोधून काढणे व प्रदूषण आणि पर्यावरणाला पोचणारी हानी कमी करणे हे सर्व पर्याय संशोधनाच्या हमी रोखण्या बरोबर जबाबदार राजकीय नेते निर्माण करणे हा बद्दल झाला आहे.

6. १९९१ नंतर लोकशाही च्या मार्गने देशाच्या आणि जगाच्या राजकारणात अनेक बद्दल झाले आहेत. एकंदरीतच आज जगात सगळया देशाच्या सामाजिक,राजकीय आणि आर्थिक स्वरूपा बद्दल झालेला दिसून येत आहे.

**संदर्भ सूची :-**

१.प्रा.बी.बी.पाटील : महाराष्ट्राचे शासन आणि राजकारण (फडके प्रकाशन, कोल्हापूर)

२.दत्ता देसाई : नव 'उदार' जगाचा उदयास्त (द युनिक फाउंडेशन,पुणे)

३. ईयत्ता बारावी : राज्यशास्त्र पाठ्यपुस्तक